६) गाऱ्हाणे - सौ. कादंबरी देशमुख.

अज्ञानाच्या अंधःकारात आम्ही होतो सुखात
कारण 'अज्ञानात सुख असते' हे आम्हाला आता पटते
आता म्हणे खेडी उजळली, घरोघर आली बिजली
नळ, शाळा खेडी गजबजली
शिकून सवरून पण पोरं आजची कुजली
बाराबंदी. धोतर गेलं पँट हिप्पी घरोघर आलं
दूध, व्यायाम, तालीम यापेक्षा
दारु, मटका, जुगार जालीम
म्हणे घर खेडी सुधारली
तरी चालते तंबाखूची मस्ती
बाह्यरंग सुधारले, पण अंतरंग
अंधारापेक्षा काळेकुट्ट झाले
सारी फुंकाई, बंडाई, चढाई
यातून आता खेडे वर येतच नाही

